MHGA010002572022

सत्र खटला क्र.३७/२०२२
महा. शासन
—विरुध्द— नितेश मेश्राम व इतर

निशाणी १९ वरील आदेश
(दि.१९/०५/२०२३)

१. अर्जदार/आरोपी क्र.१ नितेश लाईकदास मेश्राम याने कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहितेप्रमाणे गडचिरोली पोलीस स्टेशन येथील गुन्हा क्र. १०५२/२०२१ कलम ३०२, ३८०, १२०—ब, ४६० सहकलम ३४ भा.दं.वी. अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. तो मौजा देवुळगाव, ता.आरमोरी, जि. गडचिरोली येथील रहिवासी आहे.

२. फिर्यादमध्ये कथन केल्याप्रमाणे सदर गुन्हयाशी आरोपीचा कोणताही संबंध नाही. त्याला खोटया गुन्हयात फसविण्यात आले आहे. पोलीसांचा तपास पुर्ण झाला असल्याने न्यायालयीन कोठडीची आवश्यकता नाही. आरोपीकडुन कोणत्याही प्रकारची जप्ती शिल्लक नाही. आरोपी कोठेही पळुन जाणार नाही. करीता न्यायालय ज्या अटी व शर्ती लावेल त्याचे पालन करण्यास तो तयार आहे. करीता अर्जदार/आरोपीला जामीन मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. सरकारी अधिवक्ता यांनी अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.२० नुसार दिले की, फिर्यादीचा मोठा मुलगा सुबोध हा बीए अंतीम वर्षाला शिकत होता व लहान मुलगा आठव्या वर्गात शिकत होता. फिर्यादीचे सन १९८९ मध्ये लग्न झाले असुन त्यांची सासुरवाडी खडकी, ता. कुरखेडा आहे. त्यांचे सासरे खुशालराव हे दि.६.५.२०२१ रोजी मयत झाले. त्यानंतर त्यांचे सासुने तेरवीचा कार्यक्रम दि.१९.१२.२०२१ रोजी आयोजित केला असल्याने सुबोध यास घराची देखभाल करण्याकरीता घरी ठेवुन फिर्यादी त्यांची पत्नी व लहान मुलगा हे

मोटारसायकलने तेरवीच्या कार्यक्रमाला गेले. कार्यक्रम आटोपुन लहान मुलासह गडचिरोली येथे संध्याकाळी सहा वाजता घरी आल्यावर घराचे गेटचा ताला खोलला त्यावेळेस मोठा मुलगा सुबोध यास नावाने आवाज दिला. दरवाज्याला ढकलुन बैठक खोलीमध्ये गेले असता त्यांना सुबोध हा बेडवर उबडा, दोन्ही हाताला पांढ—या रंगाच्या टुपीन केबलने बांधुन डोक्यावर पॉलीथीनची पिशवी बांधुन निपचीत पडलेला दिसला. बैठक खोलीला लागुन असलेल्या बेडरुममध्ये अलमारी खाली पडलेली, अलमारीचे लॉक तोडलेले दिसले व सामान अस्ताव्यस्त दिसले. अलमारीतील दागीण्यांमध्ये ३ ग्रॅम सोन्याची अंगठी, कानातील सोन्याचे झुमके १० ग्रॅम, गळयातील नेकलेस ९ ग्रॅम, कानातील सोन्याच्या बि—या ३ ग्रॅम असा एकुण १,२३,०००/— रु चे सोन्याचे दागिने कोणतरी अज्ञात चोरटयांनी घ राचे खुल्या दारातुन आतमध्ये प्रवेश करुन फिर्यादीचे मोठया मुलास गळा दाबुन जिवे ठार केले व अलमारीतील सोन्याचे दागिने घेवुन पसार झाले.

४. फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा अप.क्र.१०५२/२०२१, कलम ३०२ आणि ३८० भादंवी अन्वये नोंद करुन तपासात घेतला. गुन्हयाचे तपासात सदरचा गुन्हा मयताचे कोणीतरी ओळखीच्याच ईसमाने केल्याचा प्राथमिक संशय आला. फिर्यादीचे पुरवणी बयान घेतले असता त्याने सांगितले की, ते तेरवीच्या कार्यक्रमाला जातांना साळभाउ यांचा मोठा मुलगा अर्जदार/आरोपी यास कार्यक्रमाला चालणेबाबत विचारले असता अर्जदार/आरोपी हा घरीच थांबला. यावरुन त्याचेवर गुन्हयात अधिक संशय बळावल्याने दि.२४.१२.२०२१ रोजी गुन्हयातील आरोपीस ताब्यात घेवुन कबुली जबाब नोंदविला असता आरोपी सुमीत मेश्राम याने कथन केले की, दि.१९.१२.२०२१ रोजी तो आणि अर्जदार/आरोपी हे मोटारसायकलने केल्सडीन जनबंधु हा कुटूंबासह गावी गेला असतांना सुबोध एकटाच घरी असल्याची संधी साधुन घरात प्रवेश करुन सुबोध हा घरी झोपला असतांना त्याचे दोन्ही हात टेबल पंख्याचे केबलने पाठीमागे बांधुन, प्लास्टीक पिशवी डोक्यातुन गळयापर्यंत घालुन पिशवी गळयाला आवळुन बांधुन नाक तोंड दाबुन खुन केला व दुस—या खोलीतील अलमारी तोडुन त्यात ठेवलेले

सोन्याचे दागीने चोरुन नेवुन ते अर्जदार/आरोपीकडे ठेवले व मोबाईल त्याचेकडे घरी लपवुन ठेवला, तो काढुन देतो असे म्हणाला. चोरीस गेलेले सोन्याचे दागिने, मोबाईल व अर्जदार/आरोपी याने घटनेच्या वेळी वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील आरोपीतांनी कट रचुन आखलेल्या योजनेप्रमाणे रात्रीचे वेळेस फिर्यादीचे घरात प्रवेश करुन मुलास जिवे ठार मारुन, घरफोडी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने अर्जदार/आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा अप.क्र.१०५२/२०२१, कलम ३०२, ३८०, १२०–ब, ४६० सह कलम ३४ भादंवी अन्वये नोंदविण्यात आला. सदरचा मामला हा न्यायप्रविष्ट असुन आरोपीला जामीन मिळाल्यास तो फिर्यादी व साक्षदारांवर दबाव आणुन पुन्हा एखादा गंभीर गुन्हा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अर्जदार/आरोपी हा न्यायालयात पैरवीचे वेळी हजर न होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता, अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. गुन्हयाची हकीकत अशी की, फिर्यादी केल्सडीन जनबंधु हे खडकी, ता.कुरखेडा येथे दि.१९.१२.२०२१ रोजी त्यांचे सास–याचे तेरवीच्या कार्यक्रमास गेले असता अज्ञात आरोपितांनी फिर्यादीचा मुलगा सुबोध हा रात्री एकटाच घरी झोपलेला असतांना घरात प्रवेश करुन सुबोध याचे दोन्ही हात पंख्याचे केबलने बांधुन, डोक्यातुन गळयापर्यंत प्लास्टीक पन्नी घालुन, गळयाला दोराने आवळुन जिवे ठार केले व दुस–या खोलीतील आलमारी तोडुन आलमारीतील सोन्याचे दागिने चोरुन पळुन गेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा अप क्र. १०५२/२०२१ कलम ३०२, ३८० भादवी प्रमाणे नोंद करुन तपासात घेतला.

६. सदर गुन्हयाचे प्राथमिक तपासात सदरचा गुन्हा फिर्यादी/मयताचे कोणीतरी ओळखीच्याच इसमाने केला असल्याचा संशय आल्याने तसेच फिर्यादी ने त्याचे पुरवणी बयानात खडकी येथे तेरवीच्या कार्यक्रमाला जातांना प्रथम मौजा देउळगाव येथे जावुन त्याचा साळभाउ लाइकदास मेश्राम याचे घरी जावुन त्याचा मोठा मुलगा अर्जदार/आरोपी यास तेरवीच्या कार्यक्रमाला चालणेबाबत विचारले असता आरोपी हा तेरवीच्या कार्यक्रमाला न जाता घरीच थांबला होता. यावरुन

अर्जदार/आरोपी याचे हालचालीवर विशेष लक्ष ठेवुन दि.२४.१२.२०२१ रोजी दोन्ही आरोपींना ताब्यात घेवुन गुन्हयासंबंधात विचारपुस केली असता आरोपींनी गुन्हयाची कबुली देवुन गुन्हयाचे सहभागाबाबत सविस्तर विश्लेषीत केले. तसेच आरोपी क्र.२ सुमीत याचे घरुन चोरुन नेलेला मोबाईल जप्त करण्यात आला. तसेच सोन्याचे दागिने व गुन्हयात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली. सदर गुन्हयातील आरोपींनी कट रचुन आखलेल्या योजनेप्रमाणे सामाईक इरादयाने रात्रीचे वेळेस फिर्यादीचे घरात प्रवेश करुन फिर्यादीचे मुलास जिवे ठार मारुन, घ ारफोडी करुन सोन्याचे दागीने व मोबाईल चोरुन नेला असे निष्पन्न झाल्याने दोन्ही आरोपींविरुध्द कलम ३०२, ३८०, १२०—ब, ४६० सह कलम ३४ भादवी अन्वये सदरचा गुन्हा नोंदविण्यात आला.

७. आरोपीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, दोषारोप दाखल करण्यापुर्वी आरोपीने जामीन अर्ज दाखल केला होता तो तपास अपुर्ण आहे या कारणामुळे नामंजुर करण्यात आला. त्यानंतर दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर दोन्ही आरोपींनी निशानी ३ प्रमाणे जामीन अर्ज दाखल केला, परंतु दि.१२.८.२०२२ रोजी न्यायालयाने तो जामीन अर्ज नामंजुर केला. दि.१२.८.२०२२ पासुन आजपावेतो कोणतीही प्रकरण चालविण्याकरीता अभियोग पक्षाने कार्यवाही केलेली नाही आणि त्यामुळे अर्जदार विनाकारण गजाआड ठेवले असल्याने त्यांना जामीन मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

८. अर्जदाराने कोणताही गुन्हा केलेला नाही. कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षदार या प्रकरणात नाही. फिर्यादी हे अर्जदाराचे जवळचे नातेवाईक आहेत व ते आता हयातीत नाहीत. त्यामुळे फिर्यादीवर दबाव आणण्याचा प्रश्न उद्भवत नाही. फिर्यादमध्ये मृत्यूचे कारण गुदमरल्यामुळे झाले असल्याचे नमुद केले आहे, परंतु वैदयकिय प्रमाणपत्रामध्ये गळा आवळल्याने मृत्यू झाला असे नमुद केले आहे. त्यामुळे मृत्यूच्या कारणात तफावत असल्याचे दिसुन येते. प्रकरणात कोणत्याही प्रकारची प्रगती झाली नसल्याने अर्जदार यास जामीन मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

९. याउलट सरकारी वकिलांनी असा युक्तीवाद मांडला की, आरोपी व फिर्यादी हे नातेवाईक असुन आरोपीस माहीत होते की, फिर्यादी हे सास–याचे गावी गेले असल्याने सुबोध हा घरी एकटा आहे. त्यामुळे दोन्ही आरोपींनी फिर्यादीचे घरात प्रवेश करुन सुबोधचा खुन केला आणि घरातील मौल्यवान वस्तुची चोरी केली. चोरी केलेला मुद्देमाल आरोपींनी दिलेल्या निवेदनाप्रमाणे जप्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदाराचा गुन्हयाशी संबंध असल्याचे उघडपणे दिसुन येते. आरोप खुनासंबंधी असल्याने गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे. त्यामुळे अर्जदारास जामीन मंजुर करण्यात येवुन नये अशी विनंती केली.

१०. प्रथमचे दोन अर्ज नामंजुर करण्यात आलेले आहेत तेव्हा परिस्थीतीमध्ये बदल झाल्याशिवाय सदरचा अर्ज चालण्यास पात्र आहे अथवा नाही याबाबत उहापोह करणे गरजेचे आहे. दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर निशानी ३ प्रमाणे दिलेला जामीन अर्ज दि.१२.८.२०२२ रोजी नामंजुर करण्यात आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक, पो.स्टे.गडचिरोली यांनी दि.४.४.२०२३ रोजी गुन्हयातील मुद्देमाल व सीए परिक्षण अहवाल दाखल करण्याबाबत अर्ज दिला. तदनंतर आरोपीने दि.१५.५.२०२३ रोजी सदरचा जामीन अर्ज दाखल केला. एकुणच प्रथमचा जामीन अर्ज निशानी ३ आणि आताचा दुसरा जामीन अर्ज निशानी १९ दाखल करेपर्यत परिस्थीतीत कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे सदरचा जामीन अर्ज चालण्यास पात्र ठरत नाही.

११. फिर्यादीचे घरुन चोरी गेलेला मुद्देमाल आरोपी यांच्या निवेदनाप्रमाणे जप्त करण्यात आाल. त्यामुळे आरोपीचा या गुन्हयाशी संबंध असल्याचा उघडपणे दिसुन येते. मृतकाच्या मृत्यूच्या कारणाबाबत तफावत असल्याचे अर्जदाराचे वतीने युक्तीवाद मांडण्यात आला, परंतु ती तफावत आहे अथवा नाही हे तपासाअंती ठरविल्या जाईल, परंतु या घडीला मृतक सुबोध याचे नैसर्गिक मृत्यू झालेला नाही असे इंक्वेस्ट पंचनामा आणि शवविच्छेदन अहवालावरुन म्हणता येईल. जेव्हा तपास पुर्ण होवुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे तेव्हा प्रकरण जलदगतीने चालविणे अभियोग पक्ष व आरोपी यांचे

हिताचे राहील. अशा परिस्थितीत अर्जदारास जामीन मंजुर करणे न्यायोचित होणार नाही. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

जामीन अर्ज निशानी १९ नामंजुर करण्यात येतो.

२. अभियोग पक्षाने प्रकरण जलदगतीने चालविण्याकरीता प्रयत्न करावे व पुढील तारखेला ड्राफ्ट चार्ज दयावा.

३. साक्षदार ललीता जनबंधु व कपील जनबंधु यांची साक्ष नोंदविल्यानंतर अर्जदार/आरोपीला जामीन अर्ज दाखल करण्याची मुभा देण्यात येते.

Ravishankar Namdeorao Bawankar

Digitally signed by Ravishankar Namdeorao Bawankar
Date: 2023.05.19 13:35:09 +0530

गडचिरोली.
दि. १९/०५/२०२३

(र. ना. बावनबर),
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
गडचिरोली.